सकाळ

# विद्यापीठात जागतिक दिव्यांग दिन




कोल्हापूर : दिव्यांग दिनाच्या कार्यक्रमात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठ आणि यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डीसॅबिलिटीज समावेशी संसाधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिन झाला.

अध्यक्षीय मनोगतामध्ये बोलताना शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी चौकस आणि सर्जनशील असावे. दिव्यांग विद्यार्थ्यांना आपुलकीने स्वीकारावे. दिव्यांग विद्यार्थ्यांना विज्ञानविषयक आवश्यक सोयी-सुविधा देऊ.' या वेळी सहना एनेगिरी या दिव्यांग विद्यार्थिनीने अनुभव सांगितले. संगीता निकम, संतोष परीट यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची स्वागत आणि प्रास्ताविक यूजीसी



स्कीम फॉर पर्सन्स विथ डीसॅबिलिटीज, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर याच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी दिव्यांगांसाठी विज्ञानाची सहजता वाढवण्यासाठी कल्पना सुचवाव्यात, असे आवाहन केले. सतीश नवले यांनी आभार मानले.

लोकमत

# परीक्षा अर्जासाठी १० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेचा परीक्षा अर्ज भरण्यास शनिवार (दि. १०)पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी शनिवारी पत्रकाद्वारे दिली. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२मधील हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर भाग २ व ३ परीक्षेचा अर्ज भरण्याच्या तारखा यापूर्वी जाहीर केल्या होत्या. तरीसुद्धा अद्यापही काही विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याचे राहिले असल्याबाबत कळविले आहे. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याकरिता अतिविलंब शुल्कासहीत परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखेला २९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२२पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यात परीक्षा अर्ज ऑनलाइन अॅप्रुव्हल करण्याची तारीख १२ डिसेंबर, तर महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जांच्या याद्या १४ डिसेंबर २०२२पर्यंत अतिविलंब शुल्कासहीत सादर करावयाच्या आहेत.

लोकमत

# विद्यापीठात दिव्यांग दिन उत्साहात

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी निरीक्षण करून नवीन गोष्टीचा शोध घेतला पाहिजे. नेहमी चौकस आणि सर्जनशील असले पाहिजे. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी शनिवारी केले. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शनिवारी शिवाजी विद्यापीठात यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डीसॅबीलीटीज समवेशी संसाधन केंद्रातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. दिव्यांग विद्यार्थिनी सहना एनेगिरी,संगीता निकम यांनी मनोगत व्यक्त केले.

महासत्ता

# तृतीयपंथीयांना समाजात स्थान मिळवून देण्यासाठी माध्यमांची भूमिका महत्त्वाची

## प्रा. साधना झाडबुके

कोल्हापूर ता.३(प्रतिनिधी)-

..........................

तृतीयपंथीयांना समाजात स्थान मिळवून देण्यासाठी माध्यमांची भूमिका महत्त्वाची असते असे मत प्रा. साधना झाडबुके यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या जर्नलिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने आयोजित 'तृतीयपंथीय आणि माध्यमे' या विषयावरील व्याख्यान प्रसंगी त्या बोलत होत्या.

तृतीयपंथीयांची समाजाकडून होणारी अवहेलना, विविध पद्धतीने हिनवणे, चेष्टा करणे, विनयभंग करणे तसेच त्यांना मिळणारी वागणूक, त्यांच्या समस्या याविषयी सामाजिक कार्यकर्त्या संशोधक प्रा. साधना झाडबुके त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी केंद्र सरकारच्या तृतीयपंथीयांसाठीचा २०१९ च्या कायद्याची माहिती दिली तसेच माध्यमांनी या कायद्यातील तरतुदी सर्वसामान्यां पर्यंत पोहोचवणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. याप्रसंगी कादंबरी भोसले, सिमरन घाशी या विद्यार्थिनींनी आपले मत मांडले सुरूवातीस विभाग प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, सचिन दिवाण अनुराधा इनामदार आणि विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

महासत्ता

# आंतरविद्यापीठ लॉन टेनिस स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ पात्र

कोल्हापूर, ता. ३ (प्रतिनिधी) -

मुंबई विद्यापीठ येथे आयोजित केलेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पश्चिम विभागीय लॉन टेनिस स्पर्धेत ५४ विद्यापीठांनी सहभाग नोंदवला. यामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने एकूण पाच सामने जिंकून दिल्ली सोनीपत येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये स्थान मिळविले.

शिवाजी विद्यापीठ संघाकडून संदेश कुरले व पार्थ पाटील यांनी उल्लेखनीय कामगिरी करून विजय मिळवून देण्यासाठी मोलाचा वाटा उचलला. ओमकार इस्लामपुरे, तेजस कुलये, सर्वजीत लांडगे या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. संघ व्यवस्थापक प्रा. मुजफ्फर लगीवाले व कोच मनाल देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.

04 DEC 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ५९ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ साधारणपणे फेब्रुवारी/ मार्च २०२३ मध्ये नियोजित आहे.
- ऑक्टोबर २०२१ व मार्च २०२२ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी/पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन आणि खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये विहित नमुन्यासह पदवी प्रमाणपत्र मागणीकरिता दीक्षांत अर्ज करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कालावधी | विहीत शुल्क |
|---|---|---|
| १) | दि. ०५ डिसेंबर २०२२ ते दि.२४ डिसेंबर २०२२ पर्यत | रु. २५०/- |
| २) | दि. २५ डिसेंबर २०२२ ते दि.२९ डिसेंबर २०२२ पर्यत | रु. ३५०/- |
| ३) | दि. ३० डिसेंबर २०२२ ते दि. ३ जानेवारी २०२३ पर्यत | रु ८५०/- |
| ४) | पीएच.डी. प्राप्त विद्यार्थ्यांचे दीक्षांत अर्ज दि. ०७ जानेवारी २०२३ पर्यत रु ८५०/- शुल्काने स्वीकारले जातील. | |

- सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत स्वत:च्या माहितीसाठी जपून ठेवावी. विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- सर्व विधीशाखा (लॉ) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी संगणक प्रणाली मधून अर्ज भरताना कोणत्या वर्षाची पदवी प्रमाणपत्र आवश्यक आहे त्या वर्षाचा कोर्सकोड बिनचुक निवडावा. यात चूक झाल्यास त्याची जबाबदारी संबंधितांची राहील.
- २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या ज्या विदयार्थ्यांचा फॉर्म Regular ऑप्शनमधून भरला जात नाही, त्या विद्यार्थ्यांनी फॉर्म भरण्यासंदर्भात प्रत्यक्ष दीक्षांत विभागामध्ये संपर्क साधावा. फॉर्म भरणेकरीता आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. (अंतीम वर्षाचे मार्कलिस्टची झेरॉक्स, स्वत:चा आयकार्ड साईज फोटोच्या दोन प्रती व फोटोशी साम्य असलेले स्वत:चे आयडेंटी प्रुफ झेरॉक्स, आईचे नावासंदर्भात आवश्यक कागदपत्रे उदा. आईचे आधारकार्ड, वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी Internship Completion Certificate प्रत आणणे आवश्यक आहे.) तसेच ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठात येणे शक्य नसेल त्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा. (फोन नं.०२३१-२६०९११३/२६०९३०२ व ईमेल - convocation@unishivaji.ac.in)
- काही तक्रार किंवा दुरुस्ती असल्यास, विद्यार्थ्यांनी त्याच्या Log in मधील Grievence मध्ये ती नोंदवावी.
- दीक्षांत समारंभ आयोजनाची तारीख व त्या संदर्भातील सर्व माहिती यथावकाश कळविणेत येईल. दीक्षांत समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्र पात्र विद्यार्थ्यांची यादी व इतर अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
- ५९ दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने पदवी प्रमाणपत्र मागणी अर्जाबाबतचे सविस्तर निवेदन www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर ठेवण्यात आले आहे.

**दीक्षांत विभाग**
**दि .: ०४ डिसेंबर २०२२**

**डॉ. अजितसिंह एन.जाधव**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

पुढारी



# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर/नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर भाग-२ व ३ परीक्षेसाठी अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सुधारित तारखा विद्यापीठाने जाहीर केल्या आहेत.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. सुधारित तारखेनुसार महाविद्यालय, पदव्युत्तर अधिविभागात विद्यार्थ्यांना १० डिसेंबरपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहे. परीक्षा अर्ज १२ डिसेंबरपर्यंत अॅप्रूव्ह करता येणार आहे. महाविद्यालयांनी विद्यापीठात परीक्षा अर्जाच्या याद्या १४ डिसेंबरपर्यंत जमा करणे आवश्यक आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठात उद्यापासून 'स्तुती' अंतर्गत तिसरा प्रशिक्षण कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे पुन्हा 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रमास सोमवार (दि..५) पासून सुरुवात होणार आहे. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा. केदार सिंग उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्रशिक्षण कार्यक्रमात सात दिवस दिल्ली, बंगळूर, मंगळूर, मुंबई, पुद्दुचेरीमधील १४ तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने होणार आहेत. सहभागींसाठी सांस्कृतिक कार्यक्रम व अभ्यास सहलीचे आयोजन केल्याची माहिती समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
04 DEC 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहाजी महाविद्यालयाकडे विजेतपद

## शिवाजी विद्यापीठ विभागीय फुटबॉल स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ विभागीय फुटबॉल स्पर्धेत दसरा चौक येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपदासह कै. रामराव मुळीक चषकावर आपले नाव कोरले. अटीतटीच्या अंतिम सामन्यात स. ब. खाडे महाविद्यालयावर ३ विरुद्ध १ अशी मात करत शहाजी महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. तात्यासो कोरे अभियांत्रिकी महाविद्यालय, वारणानगर येथे या स्पर्धा झाल्या.



**कोल्हापर : शिवाजी विद्यापीठ विभागीय फुटबॉल स्पर्धेतील विजेता श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचा फुटबॉल संघ.**

तत्पूर्वी उपांत्य सामन्यात शहाजी महाविद्यालयाच्या संघाने भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय संघावर ४ विरुद्ध ० गोलने एकतर्फी विजय मिळवला. स्पर्धेदरम्यान संघनायक प्रतीक बदामे, प्रभू पोवार, प्रथमेश हेरेकर व रोहित पोवार यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडवले. विजेत्या संघास संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, जिमखानाप्रमुख डॉ. प्रशांत पाटील व प्रशिक्षक विश्वास कांबळे यांचे प्रोत्साहन लाभले.

पुण्यनगरी

# विद्यापीठामध्ये जागतिक दिव्यांग दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये 'जागतिक दिव्यांग दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. शिवाजी विद्यापीठ आणि यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज समावेशी संसाधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी नेहमी सर्जनशील असायला हवे. निरीक्षण करून नवीन गोष्टींचा शोध घेतला पाहिजे. प्रास्ताविक यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीजच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. सतीश नवले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 DEC 2022
पुण्यनगरी

# तृतीयपंथीयांची अवहेलना चिंताजनक : प्रा. झाडबुके

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तृतीयपंथीयांची समाजाकडून होणारी अवहेलना चिंताजनक आहे. तृतीयपंथीयांना समाजात स्थान मिळवून देण्यासाठी माध्यमांची भूमिका महत्त्वाची असते, असे मत प्रा. साधना झाडबुके व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'तृतीयपंथीय आणि माध्यमे' या विषयावरील व्याख्यानप्रसंगी त्या बोलत होत्या.

तृतीयपंथीयांची समाजाकडून होणारी अवहेलना, विविध पद्धतीने हिणवणे, चेष्टा करणे, विनयभंग करणे, तसेच त्यांना मिळणारी वागणूक, त्यांच्या समस्या याविषयी सामाजिक कार्यकर्त्या संशोधक प्रा. साधना झाडबुके यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी कादंबरी भोसले, सिमरन घाशी या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. डॉ सुमेधा साळुंखे, सचिन दिवाण, अनुराधा इनामदार आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : प्रा. साधना झाडबुके यांचे स्वागत करताना डॉ. शिवाजी जाधव, विभागप्रमुख डॉ. निशा पवार, डॉ. सुमेधा साळुंखे, सचिन दिवाण, अनुराधा इनामदार.**

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा जानेवारीत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील सर्व परीक्षांच्या सुधारित प्रारंभ तारखा प्रसिद्ध केल्या आहेत. या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने वर्णनात्मक स्वरूपामध्ये घेण्यात येणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षा विद्यापीठातर्फे घेण्यात येणार आहेत. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक परीक्षा विभागातर्फे यथावकाश प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑफलाईन स्वरूपात घेण्यात येणार आहेत. या परीक्षा सत्रनिहाय अभ्यासक्रमावर, ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत दिल्या जाणाऱ्या निवेदनांची दखल घेण्यात येणार नाही, असेही परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी स्पष्ट केले.

सकाळ

# 'स्तुती'चे विद्यापीठात तिसरे प्रशिक्षण

कोल्हापूर, ता. ३ : केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुतीअंतर्गत तिसरा प्रशिक्षण कार्यक्रमाचे सोमवारी (ता. ५) उद्‍घाटन होणार आहे, अशी माहिती केंद्रप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली आहे.

या वेळी भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाअंतर्गत असणाऱ्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य यांची मुख्य उपस्थिती लाभेल. मुख्य अतिथी म्हणून जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा. केदारसिंग असतील. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवतील. यावेळी सात दिवस दिल्ली, बंगळूर, मंगळूर, मुंबई, पुद्दूचेरी यासह विविध शहरांतून येणाऱ्या १४ संशोधकांची व्याख्याने ऐकायला मिळतील.

जनसंपर्क कक्ष
04 DEC 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर भाग-२ व ३ परीक्षेसाठी अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सुधारित तारखा विद्यापीठाने जाहीर केल्या आहेत.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. सुधारित तारखेनुसार महाविद्यालय, पदव्युतर अधिविभागात विद्यार्थ्यांना १० डिसेंबरपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहे.

परीक्षा अर्ज १२ डिसेंबरपर्यंत ॲप्रूव्ह करता येणार आहे. महाविद्यालयांनी विद्यापीठात परीक्षा अर्जाच्या याद्या १४ डिसेंबरपर्यंत जमा करणे आवश्यक आहे. अशी माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

0 4 DEC 2022

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदेंचे विचार कृतीतून अमलात आणण्याची गरज : सुनीलकुमार लवटे



कोल्हापूर : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील व्याख्यानात बोलताना डॉ. सुनीलकुमार लवटे. शेजारी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, हंबीरराव पाटील, डॉ. सुरेश शिखरे, रवींद्र भोसले, डॉ. सरोज पाटील.

**कोल्हापूर, ता. ३ :** 'समकालीन प्रश्न सोडविण्यासाठी महर्षी वि. रा. शिंदे यांचे विचार कृतीतून अमलात आणण्याची गरज आहे,' असे प्रतिपादन डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचा इतिहास विभाग आणि कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे संशोधनतर्फे आयोजित सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यान पुष्पात 'महर्षी वि. रा. शिंदे यांच्या विचारांची प्रस्तुतता' यावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

डॉ. लवटे म्हणाले, ''शेतकऱ्यांचे, वंचितांचे, महिलांचे प्रश्न आजही गंभीर स्वरूप धारण करून आहेत. महर्षी शिंदे यांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील या आणि इतर समस्यांसाठी कृतीयुक्त लढा दिला. अमेरिकेत जाऊन त्यांनी सर्व धर्मांचा चिकित्सक अभ्यास केला. सर्व धर्मांनी चांगलीच तत्त्वे सांगितली आहेत, त्याचे आचरण करून मानवकल्याण साधले पाहिजे; परंतु धर्ममार्तंड आपल्या स्वार्थासाठी समाजाला अंधश्रद्धाळू बनवून शोषण करतात. आजच्या युगात धर्माच्या जोखडात गुंतून न पडता सर्वसमावेशक जीवन जगले पाहिजे.''

प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे संशोधन केंद्रातील उपक्रमांची माहिती दिली. समन्वयक डॉ. एस. व्ही. शिखरे यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. एस. एस. पाटील यांनी परिचय करून दिला. प्रा. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. डी. अपराध यांनी आभार मानले. संयोजन डॉ. एस. डी. जाधव यांनी केले. या वेळी सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील यांचे नातू हंबीरराव पाटील, सुनील नागावकर, प्रकाश आमटे, प्रबंधक रवींद्र भोसले, ग्रंथपाल डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. एन. एस. जाधव, डॉ. आर. डी. मांडणीकर उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विभागीय फुटबॉल स्पर्धेतील विजेता श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचा फुटबॉल संघ.

# शहाजी महाविद्यालय विजेता

**कोल्हापूर :** वारणानगर येथील तात्यासो कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय फुटबॉल स्पर्धेत श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपदासह (कै.) रामराव मुळीक चषकावर नाव कोरले. अंतिम सामन्यात स. ब. खाडे महाविद्यालयावर तीन विरुद्ध एक मैदानी गोल नोंदवून शहाजी महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला. तत्पूर्वी उपांत्य सामन्यात भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयावर चार विरुद्ध शून्य गोलने मात केली. स्पर्धेदरम्यान संघनायक प्रतीक बदामे, प्रभू पोवार, प्रथमेश हेरेकर, रोहित पोवारसह सर्वांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडविले. विजेत्या संघास संस्थेचे अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, सचिव विजयराव बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, जिमखानाप्रमुख डॉ. प्रशांत पाटील, प्रशिक्षक विश्वास कांबळे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
04 DEC 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात स्तुती प्रशिक्षण कार्यक्रम सोमवारपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पुन्हा स्तुति प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन सोमवार ५ डिसेंबर रोजी होईल. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान



विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य यांची मुख्य उपस्थिती आहे. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा. केदार सिंग आहेत. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषवणार आहेत, अशी माहिती स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली. शिवाजी विद्यापीठातील प्रशिक्षण कार्यक्रमात सात दिवस दिल्ली, बंगलोर, मंगळूर, मुंबई, पाँडिचेरी अशाप्रकारे देशातील विविध शहरांतून १४ संसाधन व्यक्तीची व्याख्याने होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
04 DEC 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुवाहाटी विद्यापीठात स्तुती कार्यक्रम उत्साहात

## स्तुतीचे समन्वयक डॉ. सोनकवडे यांनी दिली आधुनिक उपकरणांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

आसाम येथील गुवाहाटी विद्यापीठात स्तुति कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात संशोधक प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. समारोपप्रसंगी गुवाहाटी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे डीन डॉ. रंजन काकती, इन्स्ट्युमेंटेशन विभागप्रमुख प्रा. उत्पल शर्मा, शिवाजी विद्यापीठातील स्तुति समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि गुवाहाटी विद्यापीठ, आसाम यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुति योजनेअंतर्गत कार्यशाळेचे आयोजन केले होते.

डॉ. राजन काकती म्हणाले, स्तुती कार्यक्रमाचा फायदा बहुतेक विद्वानांना आणि प्राध्यापकांना होईल. स्तुति सारखे कार्यक्रम कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन तयार केला आहे. प्रा. उत्पल शर्मा म्हणाले, या प्रशिक्षण कार्यक्रमाचा पुरेपूर उपयोग प्राध्यापक, संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील व्यक्तींना



**कोल्हापूर : गुवाहाटी विद्यापीठातील आयोजित स्तुती कार्यक्रमात विद्यार्थी कल्याण विभागाचे डीन डॉ. रंजन काकती, शिवाजी विद्यापीएचे स्तुति समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे, प्रा. उत्पल शर्मा.**

होत आहे.

प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी स्तुति आणि विज्ञान व तंत्रज्ञान विभागात उपलब्ध योजनांची माहिती दिली. जगात सर्वाधिक तरुण लोकसंख्या भारतात आहे. ६६ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. देशाच्या भविष्यातील तांत्रिक विकासाचा विचार करता हा प्रशिक्षण कार्यक्रम अतिशय महत्त्वाचा आहे. भारताच्या ईशान्येकडील अंतर्गत भागाशी संपर्क साधायचा होता. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने गुवाहाटी विद्यापीठात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले. देशाच्या प्रगतीत ईशान्य विभागाचे मोठे योगदान आहे. अत्याधुनिक उपकरणांची उपलब्धता वाढणे आणि त्यांचे प्रशिक्षण मिळणे अतिशय महात्वाचे आहे. मेक इन इंडिया अंतर्गत नवनवीन संशोधक आणि उद्योजक देशाला मिळतील. संशोधन तसेच पेटंटच्या माध्यमातून समाजाला काहीतरी दिले पाहिजे. शिवाजी विद्यापीठातील उपलब्ध अत्याधुनिक उपकरणांविषयी माहिती त्यांनी दिली.

तरूण भारत

# पदवी, पदव्युत्तर परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२२ मधील हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर व्दितीय व तृतीय वर्षाच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी अतिविलंब शुल्कासह १० डिसेंबरपर्यंत महाविद्यालय अथवा विद्यापीठातील अधिविभागात परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालय किंवा अधिविभागांनी ऑनलाईन परीक्षा अर्ज १२ डिसेंबरपर्यंत ॲप्रूव्ह करावयाचा आहे. तर महाविद्यालय किंवा अधिविभागांनी परीक्षा अर्जाच्या याद्या अतिविलंब शुल्कासह १४ डिसेंबरपर्यंत विद्यापीठातील परीक्षा विभागात सादर करावयाच्या आहेत. परीक्षा अर्ज भरण्यासंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.